# सुरगाणा पंचायत समिती, सुरगाणा, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल.

जा.क्र.स्था-३/ब/जिप.पंस/लेपअ/सुरगाणा/नाशिक/४६१

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक- **३० जानेवारी २००९**

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

सुरगाणा पंचायत समिती, सुरगाणा जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. सं. वा. पारनेरकर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २४.११.२००८ ते १७.११.२००८ हया कालावधीत पूर्ण केले.

श्री. उ. प्र. जोशी, लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २१.११.२००८ रोजी प्रारुप अहवालाचे पुनर्विलोकन केले, अहवालाचे अंतिमीकरण व चर्चा श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १७.१२.२००८ रोजी केले.

लेखा परिक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

## सभापती

| | |
|---|---|
| श्री. हिराजी देवाजी चौधरी | दिनांक ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

## गट विकास अधिकारी

| | |
|---|---|
| श्रीमती. एम. डी. जगताप | दिनांक ०१.०४.२००७ ते ०७.०६.२००७ |
| श्री. एम. डी. केदारे (प्रभारी) | दिनांक ०८.०६.२००७ ते २६.०६.२००७ |
| श्री. बी. टी. बैरागी | दिनांक २७.०६.२००७ ते ३१.१२.२००७ |
| श्री. आर. एस. खंबाईत (प्रभारी) | दिनांक ०१.०१.२००८ ते ३१.०३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण)

---

मागील लेखा परीक्षण अहवालांतील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ.क्र | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण |
|---|---|---|---|
| १ | १९६८-६९ | ३ | १ |
| २ | १९७१-७२ | १६ | १ |
| ३ | १९७४-७५ | ११, १२ | २ |
| ४ | १९७९-८० | १५ | १ |
| ५ | १९८१-८२ | १७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.१७-अपूर्ण बांधकामाबाबत (६.१८४) | १ |
| ७ | १९८२-८३ | ४(५) | १ |
| ८ | १९८३-८४ | ८,१२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.८ – देय अनामतीबाबत (३.२(ब)२)<br>परि.क्र.१२ - अपूर्ण बांधकामाबाबत(६.१२८) | २ |
| ९ | १९८४-८५ | ५,६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.६-शेतकरी निवासस्थान बांधकामातील खर्च (६.२९) | २ |
| १० | १९८६-८७-८८ | ३,४,१२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३-शेतकरी निवासस्थांन बांधकामातील अनियमितता (६.३५)<br>परि.क्र.१२-प्रलंबित अनामत रक्कमेबाबत (६.१९७)(ब)(६) | ३ |
| ११ | १९८८-८९ | ३ | १ |
| १२ | १९८९-९० | ६,७ | २ |
| १३ | १९९०-९१ | ३,५,९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.५:- अल्पबचत भवन (शेतकरी निवासस्थान) विनियोगास दिल्याबाबत (६.१४३)<br>परि.क्र.९:- तालुका मास्तर सुरगाणा यांचेकडील रोखवही व बँकेतील शिल्लक यातील तफावतीबाबत. (६.१४३) | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | १९९१-९२ | ९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र. ९ :- ठेवी व्यपगत करणेबाबत (६.१३(ब)) | १ |
| १५ | १९९२-९३ | ३ | १ |
| १६ | १९९३-९४ | ३ | १ |
| १७ | १९९४-९५ | ५,११,१९,२७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र. १९ - अनामत रक्कमा व्यपगत केलेबाबत (४.१०२(३) | ४ |
| १८ | १९९५-९६ | ३(१,२,४,५),१३,१९,३२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क.१३-हातपंप,विद्युतपंप वसुलीबाबत (४.१२१(११) | ४ |
| १९ | १९९७-९८ | ७,८,१७,२२,३२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३२-अपूर्ण बांधकामाबाबत(४.९०)(१४) | ५ |
| २० | १९९८-९९ | ६,७,१३,१६,१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.१६-सिमेंट वसुली बाबत (४.१०७) | ५ |
| २२ | १९९९-२००० | ३,४,९,१०,१६,१९,२१<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४-प्रमाणक उपलब्ध न केलेबाबत (४.१०७(११)<br>परि.क्र.९-बँक ताळमेळ पत्रक तयार न केलेबाबत(४.९९(८)<br>परि.क्र.२१-अपूर्ण बांधकामाबाबत (४.१०२(१९) | ७ |
| २३ | २०००-२००१ | ३,४,१४,१५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४-हातपंप व विद्युतपंप थकबाकीबाबत (४.१८४)(६)<br>परि.क्र.१४-अपूर्ण बांधकामाबाबत (४.१८२(१८)<br>परि.क्र.१५-अग्रिम नोंदवहीतील अनियमितता(४.१८५)(१२) | ४ |
| २४ | २००१-२००२ | ३,८,१४,१५,१८,१९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३- बँक ताळमेळपत्रक तयार न केलेबाबत (४.२४३)(८)<br>परि.क्र.१८-अनामत रक्कम व्यपगत न करणेबाबत (४.२५१(३) | ६ |
| २५ | २००२-२००३ | ५,९,१०,११,२२<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.५:- हातपंप व विद्युतपंप थकबाकी बाबत. (४.२०३)(५) | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | २००३-०४ | ३,४,५,८,११,१५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.११:- थकीत अग्रीम रक्कमांबाबत. (४.२०१(४)<br>परि.क्र.१५:- अपूर्ण बांधकामाबाबत. (४.१९८(१०) | ६ |
| २७ | २००४-०५ | ३,४,५,७,८,१३,१६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३ :- ५०% अनुदानावर मळणी पंखे वाटप (४.११२)<br>परि.क्र.१६ :- अपूर्ण बांधकामाबाबत (४.३३२(१९) | ७ |
| २८ | २००५-०६ | ३,४,६,७,८,१०,११,१५,१६,१७,१८,२१,२२,२३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३ :- पंचायत समिती सेसमधून जी.आय. कोठया खरेदीबाबत. (४.६१०)<br>परि.क्र.४ :- पंचायत समितीच्या २०% सेस अंतर्गत शौचालय भांडे खरेदीबाबत. (४.१९०)<br>परि.क्र. २१ :- अग्रीम रक्कमा वसूलीबाबत (४.७३१(६))<br>परि.क्र. २२ :- अपूर्ण बांधकामाबाबत (४.७२८(२४)) | १४ |

| २००६ — २००७ |
|---|
| परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रक |
| परिच्छेद क्रमांक ४ :- स्थायी अग्रिम खर्चातील अनियमितता. |
| परिच्छेद क्रमांक ५ :- अनामत नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ६ :- थकीत अग्रीम रक्कमा वसुलीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ७ :- हातपंप, देखभाल-दुरुस्ती वर्गणी थकबाकी वसुलीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ८ :- ओ. पी. डी. फी उशिरा भरणा केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ९ :- अल्पबचत अनुदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १० :- संग्रारोयो, जरोयो अंतर्गत नेमलेल्या उपलेखापालाचे ग्रामपंचायत दप्तर तपासणीचे उद्दिष्टपूर्तीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ११ :- ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२ :- जिल्हानिधी, अभिकरण निधी, जिल्हा परिषद सेस निधी रोकडवहीचा बँकस्क्रोल व बँक पासबुकासोबत ताळमेळ न घेतल्याबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १३ :- तालुकामास्तर कार्यालयाकडील रोकडवहीचा ताळमेळ न घेतल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४ :- जिल्हा परिषद सेस निधीकडे चलनाने प्राप्त रक्कमेपेक्षा रोकडवहीत व पासबुकात जादा रक्कमा जमा झाल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १५ :- एकस्तर वेतनश्रेणीनुसार गटविमा रक्कमा वेतनात कपात केलेल्या असून सेवा पुस्तकांत नोंदी न घेतल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १६ :- जामीनदार हयात व लायक असलेबाबत. |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक १७ :- तालुका मास्तर यांचेकडील रोखवहीतील अनियमितता. |
| परिच्छेद क्रमांक १८ :- निवृत्ती वेतन नोंदवही अपूर्ण असणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९ :- संबंधितांना लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २० :- सेवापुस्तकामधील रजा लेखे अपूर्ण असल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २१ :- लघुपाटबंधारे उपविभाग, सुरगाणा यांचेकडील नोंदवही क्रमांक ३९ व ४१ बाबत. |
| परिच्छेद क्रमांक २२ :- बांधकाम उपविभाग, सिन्नर यांचेकडील नोंदवही क्रमांक ३९,४०, व ४१ बाबत. |
| परिच्छेद क्रमांक २३ :- अपूर्ण विहीर बांधकामाबाबत.(कृषी उपविभाग सुरगाणा) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २४ :- ग्रामपंचायत निधी व जवाहर रोजगार योजना / संपूर्ण ग्रामीण रोजगार यातील अपहारीत प्रकरणांबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २५ :- असंवितरीत धनादेशांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २६ :- अपूर्ण जवाहर विहीर बांधकामाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २७ :- आक्षेप विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक २८ :- विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक २९ :- वार्षीक लेखे. |
| परिच्छेद क्रमांक ३० :- पंचायत समितीचे लेखे |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- अनुपालन व पोहच. |

**टिप :-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या-त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांकच अंतिम समजण्यात यावेत.

---

## भाग दुसरा
## (चालू लेखा परीक्षण)

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे
## कलम ९(अ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १ :- अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती सुरगाणाचे सन २००७ – २००८ चे मुळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक १ दिनांक ३१.१.२००७ व सुधारीत अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक ३९ दिनांक २४.१.२००८ अन्वये मंजुर केलेले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | शिर्षक | मुळ तरतुद | सुधारीत तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | ५,००० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | ४ बांधकाम (इवद) | ५,००० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | ५ ल.पा. | ५,००० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | ८ सार्व.आरोग्य | ५,००० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | ११ शेती | ५,००० | ५,००० | ४,९९९ | १ | ०० |
| ६ | १२ पशुसंवर्धन | ५,००० | १८,३२५ | १८,२७० | ५५ | ०० |
| ७ | १४ समाजकल्याण | १०,००० | ४०,००० | ३९,९९० | १० | ०० |
| ८ | २० संकीर्ण म.बा.क. | ५,००० | २०,००० | ०० | २०,००० | ०० |
| ९ | २० संकीर्ण | ५,००० | ०० | ०० | ०० | ०० |
| | **एकूण** | **५०,०००** | **८३,३२५** | **६३,२५९** | **२०,०६६** | **००** |

सुरुवातीची शिल्लक रुपये ६५,०८२/- + प्राप्त अनुदान रुपये ३८,७१५/- असे एकूण रुपये १,०४,६९७/- उपलब्ध होते. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सन २००७ – २००८ साठी रक्कम रुपये १,०४,६९७/- जमा असतांना खर्च रक्कम रुपये ६३,२५९/- करण्यात आलेला आहे तो तरतुदींपेक्षा रक्कम रुपये २०,०६६/- व प्राप्त अनुदानापेक्षा रक्कम रुपये ४१,४३८/- ने कमी आहे. याचाच अर्थ अंदाजपत्रक नियोजनपूर्वक व वस्तुस्थितीस धरुन केलेले नाही.

२) मा. जिल्हाधिकारी, नाशिक व तहसिलदार, सुरगाणा यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून या पंचायत समितीचा दि. ३१.३.२००८ अखेर किती उपकर वसुल झाला, किती प्राप्त व्हावयाचा आहे, याबाबत ताळमेळ घेऊन उपकराच्या सर्व रक्कमा प्राप्त झाल्याचे प्रमाणित करावे.

३) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक पंरास/१०९३/प्र.क्र./१४४३/२७/दिनांक २०.९.१९९३ नुसार उपलब्ध निधीचा पुरेपुर विनियोग ग्रामीण जनतेला होईल याबाबत अंदाजपत्रक तयार करतांना काळजी घ्यावी अशा सूचना आहेत. ज्या योजनांसाठी खर्च करणे आवश्यक व संभवनीय होते, अशा योजनांसाठी तरतुद केली असती अथवा नियोजनपूर्वक कामे केली असती तर बचत झाली नसती. बचतीचे सार्थ स्पष्टीकरण करुन पंचायत समितीचे क्षमापन घ्यावे.

४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. मागास १०९८/प्र.क्र. ७३/३४ दिनांक २०.१०.१९९९ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या समाजकल्याणावर २०% व महिला व बालकल्याण यांवर १०% रक्कम खर्च करणे आवश्यक असतांना महिला व बालकल्याण यांवर कोणत्याही प्रकारचा खर्च करण्यांत आलेला नाही. याबाबत शासनाचे क्षमापन घ्यावे.

---

## परिच्छेद क्रमांक २ :- तालुका मास्तर सुरगाणा यांचे रोजकिर्दीतील शिल्लक अखर्चित रक्कमेबाबत.

पंचायत समिती सुरगाणा अधिनस्त तालुका मास्तर यांचेकडील सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षातील रोजकिर्द तपासणी केली असता खालीलप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर शिलकेचा तपशील नमुद आहे.

| | |
|---|---|
| १) बँक पासबुकाप्रमाणे शिल्लक | रुपये ७,७५,८६०/- |
| २) रोजकिर्दीनुसार शिल्लक | रुपये १४,२६,९०४/- |
| तफावत | रुपये ६,५१,०४४/- |

उपरोक्त तफावतीबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नमुद केला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) (+) न वटलेले धनादेश | रुपये १,२८,६७,९५१/- | |
| २) (+) बँकेने धनादेश क्र. १३३४ दि. १०.१०.०६ ची कमी प्रदान रक्कम | रुपये ३०/- | |
| ३) रोजकिर्द चुकीची शिल्लक | रुपये १२/- | रुपये १,२८,६७,९९३/- |
| १) (-) ग.वि.अ., सुरगाणा यांचा धनादेश चुकीने खर्च दर्शविला | रुपये ३,५२०/- | |
| २) (-) जमा रक्कम बँकेने जमा दर्शविली नाही | रुपये १,३४,७१,०८७/- | |
| ३) (-) बँक पासबुकात दर्शविलेली चुकीची शिल्लक | रुपये ४४,४३०/- | रुपये १,३५,१९,०३७/- |
| तफावत | | रुपये ६,५१,०४४/- |
| निव्वळ तफावत | | निरंक |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेतः

१) रोजकिर्दीमधील रुपये १२/- च्या तफावतीचे ताळमेळ घेऊन तफावत निरंक करुन पूर्तता दर्शवावी.

२) बँकेने गटविकास अधिकारी यांचे खात्यातील धनादेश चुकीने खर्च दर्शविल्याबाबत आवश्यक ते समायोजनाची कार्यवाही करुन पुर्तता दर्शवावी.

३) बँक पासबुकातील तफावत दुर करण्याबाबत बँकेशी आवश्यक तो पत्रव्यवहार करुन तफावत दुर करुन पुर्तता दर्शवावी.

४) दिनांक ३१.३.२००८ अखेर असंवितरीत रक्कमेचा गोषवारा नमुद केलेला नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम ७७(३) नुसार तीन महिन्यापेक्षा अधिक काळ वितरीत न केलेल्या रक्कमा परिषदेकडे भरणा करणे आवश्यक असतांना मोठ्या प्रमाणावर रक्कमा असंवितरीत ठेवण्यात आल्या आहेत. तरी सर्व असंवितरीत रक्कमेचा गोषवारा तयार करुन ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीच्या रक्कमा परिषदेस / शासनास भरणा करावी. तसेच सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापनासह पुर्तता दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती २०% उपकर अनुदानातून भात कापणी वैभव विळे खरेदीवरील अनियमिततांबाबत

सन २००७ – २००८ या आर्थिक वर्षासाठी व मागील पंचायत समिती २०% सेस (अखर्चित) अनुशेष असा एकूण रुपये ४०,०००/- खर्चास पंचायत समिती ठराव क्रमांक २८ व दिनांक २८.१०.२००७ अन्वये प्रशासकीय मंजूरी व गटविकास अधिकारी, सुरगाणा यांनी दिनांक २२.१०.२००७ अन्वये रुपये ४०,०००/- एवढया रक्कमेस तांत्रिक मान्यता दिली आहे.

| | |
|---|---|
| योजनेचे उद्दिष्ट | सुरगाणा तालुक्यातील मागासवर्गीय शेतक-यांची लवकर भात कापणी होऊन मनुष्य बळ वाचेल |
| आदेश | पंचायत समिती सुरगाणा जा.क्र./६५९/०७ दिनांक २३.१०.२००७ अन्वये वैभव विळे ९३० नग दोन दिवसात पंचायत समिती सुरगाणा येथे पुरवठा करावा. |
| विक्रेता | म. व्यवस्थापक, कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. नाशिक |
| खर्च | प्रमाणक क्रमांक १ दिनांक २५.३.२००८ अन्वये रुपये ३९९९०/- (प्रती नग रुपये ४३/- प्रमाणे ९३० नग) |

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने सदरचे साहित्य दिनांक २३.१.२००८ रोजी पाठविल्याची नोंद इनव्हाईस नोट वर नमुद आहे. मात्र नमुना नंबर ३० वर दिनांक ८.१.२००८ रोजी जमा दर्शविण्यात आली आहे. मालाचा पुरवठा ३ महिने उशीरा केलेला आहे. सर्वसाधारणपणे मालाचा पुरवठा उशीरा केल्यास प्रति दिवसास ०.५०% प्रमाणे रुपये २००/- दंडाची आकारणी करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु दंडाची आकारणी केलेली नाही.

२) योजनेचे उद्दिष्ट शेतक-यांची लवकरच भात कापणी होऊन मनुष्य बळ वाचेल, असे असतांना विलंबाने, म्हणजेच शेतक-यांची भात कापणी झाल्यावर दिनांक २३.१.२००८ नंतर लाभ दिल्याने योजनेचे उद्दिष्ट सफल झालेले नाही. तसेच नमुना नंबर ३० वर वाटपाची तारीख नमुद नसल्याने वेळीच वाटप केल्याची खात्री करता आली नाही.

प्रत्यक्ष पुरवठा होणेपूर्वी जमा घेणे व दंड आकारणी न करणेबाबत स्पष्टीकरण पंचायत समिती सभेसमोर सादर करुन क्षमापन घ्यावे. तसेच जबाबदारी निश्चित करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे कारवाईसाठी प्रस्तावित करण्यात यावे.

पंचायत समिती उपकर
आक्षेपाधिन रक्कम रुपये ३९,७९०/-
वसूलपात्र रक्कम रुपये २००/-
पंचायत समिती सुरगाणा

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(ब) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती सुरगाणा येथील जीप क्रमांक एम. एच. १५ ए ए ५०७४ ची वाहननिशी तपासली असता या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्र. १ नुसार वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याचे स्पष्ट होते.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र.जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दि.२४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर १३४०२ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये १,०७,२१६/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये १,०७,२१६/-

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- कर्तव्यस्थानी दिलेल्या निवासस्थानासाठी अनुज्ञप्ती शुल्काची वसूली न केल्याबाबत.**

पंचायत समिती सुरगाणाचे सन २००७ – २००८ लेखापरीक्षणामध्ये प्रमाणकांची पडताळणी केली असता प्रमाणक क्रमांक ४० दिनांक ११.९.२००७ मध्ये श्रीमती

आर. एस. गायकवाड, आरोग्य सेविका यांना दिलेल्या निवासस्थानापोटी त्यांचे वेतन देयकातून अनुज्ञप्ती शुल्क रक्कम रुपये २२०/- व सेवा शुल्क रुपये ६०/- अशी एकूण रुपये २८०/- कपात करणे आवश्यक असतांनाही कपात करण्यात आलेली नाही.

शासन निर्णय, क्र. घभाव २०००/प्र.क्र.९७/२०००/सेवा २५/दि. १७.२.२००१ तसेच मुंबई नागरी सेवा नियम १९५९ खंड - १ मधील नियम ८४९ (बी) च्या तरतुदीनुसार एकूण वित्तलब्धीच्या १०% किंवा कर्तव्यस्थानी दिलेल्या निवासस्थानाचे प्रमाणित भाडे, यांपैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क आकारावे, अशी तरतुद असतांनाही सदरची रक्कम प्रतिमाह वेतनातून कपात करण्यात आलेली नाही. रु. २८०/- प्रमाणे संबंधीतास निवासस्थान ताब्यात दिलेपासून आजपावेतो रक्कम परिगणित करुन एकरकमी वसूल करण्यात यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणात सादर करावे.

## परिच्छेद क्रमांक ६ :- दुरध्वनी देयके उशिरा भरलेबाबत.

खालीलप्रमाणे दुरध्वनी देयके उशिराने भरल्यामुळे त्यात विलंब आकार भरावा लागला आहे. सदरची विलंब आकाराची रक्कम रुपये ११०/- संबंधितांकडून वसूल करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम (रु.) | मुळ बिल रक्कम (रु.) | विलंब आकार (रु.) | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १८८ | ३१.३.२००८ | ५,४७९ | ६४५ | १० | दुरध्वनी देयक विलंब आकार जाने २००७ ते जून २००७ |
| | | | ९३६ | २० | |
| | | | ९२० | २० | |
| | | | १,०४० | ४० | |
| | | | ७७९ | २० | |

वसुलपात्र रक्कम रुपये ११०/-
२२३६ पोषण आहार
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
पंचायत समिती सुरगाणा

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(क) खालील अनियमितता.

**परिच्छेद क्रमांक ७ :- थकीत अग्रीम रक्कमांबाबत.**

सोबतच्या विवरणपत्र क्रमांक २ नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर कार्यालयातील कर्मचारी / शिक्षक यांचेकडे धान्य अग्रीम, उत्सव अग्रीम, वेतन अग्रीम, बदलीप्रवास भत्ता अग्रीम इत्यादी प्रकारच्या अग्रीमाची रक्कम रुपये ७,३८,३००/- थकीत असल्याचे दिसून येते. याबाबत यापूर्वी नियमितपणे आक्षेप नोंदविले (सन २००४ – २००५ चा क्रमांक १७, सन २००५ – २००६ चा क्रमांक २१, सन २००६ – २००७ चा क्रमांक ६) असतांनाही या वसूलीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. लेपुअ/१०९२/प्र.क्र. १४६९/३०९३ दिनांक २६.२.१९८३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रीम रुपये ७,३८,३००/- वसुल करणेची उपाययोजना करुन संपूर्ण वसुलीअंती तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(ड) खालील अनियमितता.

**परिच्छेद क्रमांक ८ :- निधींच्या रोकडवहयांमधील शिलकेबाबत.**

पंचायत समिती, सुरगाणा, सन २००७-०८ मधील जिल्हानिधी, अभिकरण योजना, जिल्हापरिषद सेस निधींच्या रोकडवहयांची पडताळणी केली असता, दिनांक ३१.३.२००८ अखेर खालीलप्रमाणे रक्कमा शिल्लक आहेत.

| निधीचे नांव | रक्कम |
|---|---|
| जिल्हानिधी | ४९,४३,२६६ |
| अभिकरण योजना | १८,१८,१६९ |
| जिल्हापरिषद सेस | ९०,१३,७११ |

उपरोक्त नमुद दिनांक ३१.३.२००८ अखेर शिल्लक रक्कमांबाबत ताळमेळ नमुद करण्यात आलेला आहे. तथापि शिल्लक रक्कमा ह्या कोणत्या आर्थिक वर्षातील व कोणत्या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदानातून अखर्चित राहिलेल्या आहेत. याबाबत बाबनिहाय गोषवारा नमुद केलेला नाही. तरी असा आर्थिक वर्षे निहाय व बाबनिहाय गोषवारा नमुद करुन अखर्चित रक्कमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन सदरी भरणा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

**परिच्छेद क्रमांक ९ :- संबंधितांना लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत.**

पंचायत समिती, सुरगाणाकडील जिल्हानिधी, अभिकरण योजना निधी सन २००७ – २००८ मधील रोखवही व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता खालील दर्शविलेले धनादेश नोव्हेंबर २००८ पर्यंत संबंधितांना प्रदान करणेत आलेले नाहीत.

| धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| जिल्हानिधी | | |
| १४७७४२ | ३१.३.२००८ | १३,५०० |
| १४७७४३ | ३१.३.२००८ | १३,५०० |
| अभिकरण | | |
| २४६४३२ | ३१.३.२००८ | ११,४२८ |
| २४६४८२ | ३१.३.२००८ | ५,०१७ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवाय खर्च करण्यास अनुमती नाही. असे असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी केवळ त्या-त्या लेखाशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणुन आवश्यकता नसतांनाच दिर्घदिन खर्च नोंदविलेला आहे. याबाबत रक्कम अंतिमत: खर्च झाल्याचे अथवा विनियोगाशिवाय पुन्हा जमा झाल्याचे आणि सदर अनियमिततेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १० :- अनामत नोंदवहीतील अनियमिततांबाबत.**

पंचायत समिती, सुरगाणा, सन २००७ – २००८ मधील अनामत नोंदवहीची पडताळणी केली असता, खालील दर्शविलेल्या रक्कमा हया अनामत सदरी दर्शविलेल्या आहेत.

| दिनांक | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १४.७.२००४ | ऑईल इंजिन लाभार्थी रक्कम | १,००० |
| १५.१.२००५ | श्री. साळवे, वाहन चालक अपघात वसुली | २०,७६६ |
| १४.२.२००५ | ग्रामविकास निधी जादा वसुली | १४२ |
| १९.३.२००५ | श्री स्वामी समर्थ मजुर सह. संस्था | ७५० |

यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत :

(अ) प्रत्यक्षात उपरोक्त दर्शविलेल्या रक्कमा हया तीन वर्षावरील असून, पंचायत समिती सुरगाणाने त्या व्यपगत करुन शासनास योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक होते. तथापि पंचायत समितीने तशी कार्यवाही न करता सप्टेंबर २००७ मध्ये

रोकडवहीमध्ये खर्च नोंदवुन पुन्हा नमुना नंबर १३ मध्ये अनामत सदरी जमा घेतलेल्या आहेत. सदरची कार्यवाही नियमबाहय असून, तात्काळ सदरच्या रकमा हया योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा कराव्यात.

(ब) श्री. साळवे, वाहन चालक यांचेकडील अपघातविषयक वसूलीची रक्कम रु. २०,७६६/- संबंधित एकूण आर्थिक नुकसानीचा अहवाल मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे सुस्पष्ट अभिप्रायांसह व अनुषंगिक कार्यवाहीसह दर्शवावा.

---

## परिच्छेद क्रमांक ११ :- नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेनुसार कपात केलेल्या अशंदान रक्कमेबाबत.

पंचायत समिती, सुरगाणा यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम कपात करुन दिनांक ३१.३.२००८ अखेर पर्यंत रुपये ४,३१,६०८/- ठेव सदरी जमा केलेली आहे.

या संदर्भात अभिप्राय नमुद करण्यात येत आहेतः

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४/ दिनांक ७.७.२००७ अन्वये नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद ८ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची माहिती नमुना नंबर १ मध्ये प्राप्त करुन राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करुन सदर कर्मचा-यांचा "निवृत्ती वेतन लेखा क्रमांक" प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २८ नुसार जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांना योग्य त्या फेर फारांसह सदर योजना लागू करण्यात अली असून कर्मचा-यांना अंशदानाइतके समतुल्य अशंदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरणास जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती, सुरगाणा यांनी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडून अद्यापपावेतो संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करुन घेतलेले नाही, कर्मचा-यांकडून कपात केलेली अंशदानाची रक्कम ठेव सदरी जमा ठेवलेली आहे. तसेच कर्मचारी अशंदानाइतके समतुल्य जिल्हा परिषदेचे अंशदान प्रदान करण्याबाबत कोणतीही तरतुद केलेली नाही.

कपात केलेली अंशदानाची रक्कम त्यावर देय होणारे व्याज संस्थेचा हिस्सा व त्यावरील व्याज व सदर योजनेनुसार समाविष्ठ कर्मचा-यांच्या भविष्याबाबतचे दायित्व हे अंशदान वसूली केल्यापासून ते राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना प्रदान होईपर्यंत प्रत्येक संस्थांच्या कार्यालय प्रमुखावर असल्याने निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करणेसाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करणेची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यालय प्रमुख नात्याने गटविकास अधिकारी यांचेवर आहे.

तरी याबाबत पंचायत समिती सुरगाणा यांनी उपरोक्त शासन निर्णयातील तरतुर्दीनुसार संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन खाते क्रमांक प्राप्त करुन घेऊन ठेव सदरी जमा केलेली रक्कम व कर्मचा-यांच्या अंशदानाइतके समतुल्य अंशदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरण मुंबई यांचेकडे त्वरीत जमा करावे पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक १२ :- ग्रामपंचायत निधी व जवाहर रोजगार योजना यातील अफरातफर प्रकरणांबाबत.

पंचायत समिती सुरगाणा अंतर्गत ग्रामपंचायतींमधील ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजनेतील अफरातफर प्रकरणांविषयी या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक “२” मध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

१) ग्रामनिधीतील एकूण ३ अफरातफर प्रकरणांत रक्कम रुपये ६२,०६८/- समाविष्ट असून दिनांक ३१.३.२००८ अखेर ठाणगाव ग्रामपंचायतीतील रक्कम रुपये ५०,४७८/- ची वसूली करण्यात आली असून उर्वरित २ प्रकरणांमधील रुपये ११,५९०/- ची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही.

२) जवाहर रोजगार योजनेतील एकूण ४ अफरातफर प्रकरणांमध्ये एकूण रुपये ३,३७,५८६/- इतकी रक्कम समाविष्ट असून त्यांपैकी २ प्रकरणांत रुपये १,५४,६६०/- इतक्या रक्कमेची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास — २००५/प्र.क्र.२६२/पंरास दिनांक ३.९.२००५ नुसार ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक डीईएन-२००६/प्र.क्र.७७१/आस्था-१२ दिनांक २८.९.२००६ नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणांत वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणांतील अपहारीत रक्कम वसूल न झाल्याने संबंधित ग्रामपंचायती व शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय कार्यवाहीसह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

## परिच्छेद क्रमांक १३ :- देयकांवर अनुदान नमुद न केल्याबाबत.

पंचायत समिती सुरगाणा यांचेकडील प्रदान देयकांचे लेखापरीक्षण केले असता प्रदान करतांना देयकांवर प्राप्त अनुदान, सदर देयकासह प्रगतीपर खर्च व शिल्लक अनुदान इत्यादी आवश्यक तपशिल नमुद केलेला नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६५ चे नियम ११० ते ११८ मधील तरतुदींनुसार मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च करता येत नाही.

देयकांवर अनुदान तपशील नमुद केलेला नसल्याने सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षातील प्रत्येक लेखाशिर्ष व तपशीलवार शिर्षनिहाय झालेला खर्च हा मंजूर अनुदानाच्या मर्यादेतच आहे किंवा कसे ? याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

तरी सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात मंजूर अनदानाच्या मर्यादेत खर्च झाल्याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

## परिच्छेद क्रमांक १४ :- विद्युत देयकात विजशुल्क आकारणी केल्याबाबत.

पंचायत समिती सुरगाणा यांनी प्रमाणक क्रमांक ६३ दिनांक २४.३.२००८ नुसार प्रदान रक्कम रुपये १,४६०/- मध्ये वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सुरगाणा या कार्यालयाचे दिनांक ११.३.२००८ चे विज देयक रुपये १,२७०/- चे प्रदान केले आहे. सदर विज देयकात रुपये १३६/- ची विज शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चा नियम १४७ टिप ३ नुसार विज देयकाचे प्रदान करण्यापूर्वी सदर देयकात विज शुल्काचा समावेश करण्यात आलेला नसल्याबाबत प्रमाणपत्र नमुद करणे आवश्यक आहे.

प्रत्यक्षात सदर देयकात रुपये १३६/- इतके विज शुल्क आकारणी केलेली असतांना संपूर्ण रक्कमेचे प्रदान करण्यात आलेले आहे.

तरी विजशुल्क आकारणी बंद करणेबाबत उपरोक्त नियमानुसार विद्युत मंडळाशी संपर्क साधून विज शुल्क आकारणी बंद करुन घेऊन तसेच कार्यालयातील इतर सर्व विद्युत देयकांची पडताळणी करुन त्यामध्ये झालेल्या विजशुल्क आकारणीचे शक्य तितक्या मागील कालावधीसाठी प्रदान विजशुल्क रक्कमेचे पुढील देयकांमध्ये समायोजन करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक १५ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसूलीबाबत.

पंचायत समिती, सुरगाणाकडील सन २००७-२००८ या कालावधीसाठी हातपंप, विद्युतपंप देखभाल दुरुस्ती नोंदवहीची पडताळणी केली असता, परिशिष्ट क्रमांक “३” मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण मागणी रुपये २,१०,६६६/- पैकी रुपये १,२५,८३४/- रक्कम वसुल झाली आहे. मात्र रुपये ८४,८३२/- वसुल होणे बाकी आहे. याबाबत शासनाचे पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक भुजल/ १०९५/ प्र.क्र.२१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप विद्युतपंपाची प्रलंबित वर्गणी संबंधीत ग्रामपंचायतींना देय अनुदानातून प्राधान्याने वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- सेवा पुस्तकांतील रजा लेखे अपूर्ण असलेबाबत.**

सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सुरगाणा अधिनस्त शिक्षण उपविभागाकडील सेवापुस्तकांची पडताळणी केली असता शिक्षकांच्या नेमणूकीपासून आज पावेतो सेवा पुस्तकात रजेचे खाते उघडलेले नाही. वर्षानुवर्षे रजा खाती दर सहा महिन्यांनी अर्जित – परावर्तित रजा जमा केलेल्या व खर्च दर्शविलेल्या नाहीत. सेवा पुस्तकातील रजेचे खाते निरंक आहे. खाली नमुद केलेल्या शिक्षकांनी परस्पर रजा घेऊन त्या सेवा पुस्तकात खर्ची न टाकता उपभोगल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. महिला शिक्षक कर्मचा-यांनी बाळंतपणाच्या रजा घेतलेल्या असतील त्यांच्याही नोंदी सेवा पुस्तकांत घेतलेल्या नाहीत, वर्षानुवर्षे रजा लेखा निरंक (कोरा) ठेवल्यामुळे त्याच्या रजा खाती किती रजा शिल्लक व किती उपभोगल्याची खात्री लेखपरीक्षणात करता आली नाही. सेवा पुस्तकांतील रजेचे खाते विनानोंद ठेवण्याचे कारण काय याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

सदर प्राथमिक शिक्षकांची नावे खालीलप्रमाणे उदाहरणादाखल देणेत येत आहे.

| अ.क्र. | नाव | शाळेचे नाव | सेवेत हजर दि. | रजा लेखा |
|---|---|---|---|---|
| १ | संजय सोमनाथ दोबाडे | मोकपाडा | २१.९.२००० | निरंक |
| २ | उन्नाजी लक्ष्मण जाधव | वांगण | १६.७.१९९२ | निरंक |
| ३ | चिंतामण नारायण गायकवाड | अंबाडा | २०.९.१९८५ | निरंक |
| ४ | सुरेश दत्तात्रय सुर्यवंशी | भवानदगड | २१.९.२००० | निरंक |
| ५ | हिरामण देवराम गावीत | जांभुळपाडा | २३.६.१९९५ | निरंक |
| ६ | युवराज झुलपु ठाकरे | काठीपाडा | १५.६.१९९२ | निरंक |
| ७ | भुषण दादाजी वडेर | खांदडी | २२.९.२००० | निरंक |
| ८ | हरी आनंदा भोये | लहान भोरमाळ | २.६.१९९८ | निरंक |
| ९ | रामचंद्र अर्जुन पवार | मोठा भोरपाडा | २६.६.१९९५ | निरंक |
| १० | हिंमतसिंग दगा ठोके | बोरगाव | २.६.१९९८ | निरंक |
| ११ | सुनिल वामन जाधव | चिखली | २.६.१९९८ | निरंक |
| १२ | विश्वास तुळशीराम पवार | चिखली | २६.६.१९९५ | निरंक |
| १३ | रंगनाथ हरी बागुल | पातली खा | १७.६.१९९६ | ३१.१२.९९ पर्यंत पूर्ण |

---

**परिच्छेद क्रमांक १७:- जादा वेतनवाढ दिलेबाबत.**

पंचायत समिती, सुरगाणाचे सन २००७-०८ चे लेखापरीक्षणामध्ये शिक्षण उपविभागातील सेवापुस्तकांची पडताळणी केली असता, श्री. रामदास सिताराम मोरे,

मुख्याध्यापक, बुबळी यांना रुपये ५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत दिनांक फेब्रुवारी २००८ मध्ये रुपये ७,९५० मुळ वेतन देय असतांना त्यांना वेतन देयकामध्ये रुपये ८,१०० मुळ वेतन प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांना मुळवेतन व त्यावरील भत्ते यांचे जादा प्रदान झालेले आहे. जादा मुळ वेतन व त्यावरील भत्त्यांची परिगणना करुन संबंधीताकडून रक्कम वसुल करण्यात यावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले नाहीत.**

पंचायत समिती, सुरगाणाचे सन २००७-०८ कालावधीतील या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ ४ ” नुसार कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३(३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत.**

पंचायत समिती, सुरगाणा येथील सन २००७-०८ वर्षात खालील नमुद ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या मासिक दैनंदिन्या विहित मुदतीत प्राप्त झालेल्या नसल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले.

| अ.क्र. | नांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री. एस. जे. ठाकरे | ग्रा. वि. अ. | मे ०७, जूलै ०७ ते ऑगस्ट ०७, डिसेंबर ०७ |
| २ | श्री. आर. टी. खोपे | ग्रा. वि. अ. | एप्रिल ०७ ते मार्च ०८ |
| ३ | श्री. जी. एस. भरसट | ग्रामसेवक | ऑक्टों.०७ ते मार्च ०८ |
| ४ | श्री. बी. आर. सोनवणे | ग्रामसेवक | एप्रिल ०७ ते मार्च ०८ |
| ५ | श्री. वाय. जी. गावीत | ग्रामसेवक | एप्रिल ०७ ते मे ०७, जुलै ०७ ते सप्टें. ०७, डिसेंबर ०७ ते मार्च ०८ |
| ६ | श्री. एस. जी. चौधरी | ग्रामसेवक | सप्टेंबर ०७ ते मार्च २००८ |
| ७ | श्री. एल. डी. वाघ | ग्रामसेवक | एप्रिल ०७ ते फेब्रुवारी ०८ |
| ८ | श्री. वा. जी. ढेरे | ग्रामसेवक | एप्रिल ०७ ते ऑक्टोंबर ०७, डिसेंबर ०७ ते फेब्रुवारी ०८ |
| ९ | श्री. सी. डी. महाले | ग्रामसेवक | फेब्रुवारी ०८ ते मार्च ०८ |
| १० | श्री. एम. एस. गायवन | ग्रामसेवक | एप्रिल ०७, मे ०७, जूलै ०७, जाने ०८ ते फेब्रु ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री. डी. आर. महाले | ग्रामसेवक | एप्रिल ०७ ते जून ०७, सप्टें. ०७, ऑक्टो.०७, जानेवारी ०८ ते मार्च ०८ |
| १२ | श्री. ए. जी. गवळी | ग्रामसेवक | मे ०७, जून ०७, ऑग. ०७, सप्टें. ०७, नोव्हेंबर ०७ ते मार्च ०८ |
| १३ | श्रीम. आर. एस. पवार | ग्रामसेवक | एप्रिल ०७, डिसेंबर ०७ ते मार्च ०८ |
| १४ | श्रीम. पी. पी. खंबाईत | ग्रामसेवक | एप्रिल ०७, मे ०७, फेब्रुवारी ०८ |
| १५ | श्रीम. एम. एम. गवळी | ग्रामसेवक | एप्रिल ०७, ऑगस्ट ०७, ऑक्टोंबर ०७, डिसेंबर ०७ ते मार्च ०८ |
| १६ | श्रीम. पी. पी. देशमुख | ग्रामसेवक | एप्रिल ०७, जाने ०८, फेब्रुवारी ०८ |
| १७ | श्रीम. वाय. वाय. पवार | ग्रामसेवक | एप्रिल ०७, जून ०७ ते सप्टें. ०७, नोव्हें ०७ ते मार्च ०८ |

यावरुन काही ग्रामसेवक दरमहा व विहीत मुदतीत त्यांच्या दैनंदिन्या सादर करीत नाहीत, हे स्पष्ट दिसून येते. तथापी पंचायत समिती स्तरावर दैनंदिन्या प्राप्त न होताच वेतन व भत्ते प्रदान केले जातात. दैनंदिन्या प्राप्त नसतांना वेतन व भत्ते प्रदान करुन गंभीर अनियमितता होत आहे. याबाबत पंचायत समितीचे सक्षम अधिकारी यांनी खुलासा करावा व केलेल्या अनियमिततेबाबत जि.प. चे सक्षम अधिकारी म्हणेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- विशेष वेतनाचे (रोखपाल रोखभत्ता) नियमबाहय प्रदानाबाबत.**

पंचायत समिती, सुरगाणांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उंबरठाण मधील कर्मचा-यास विशेष वेतन प्रदान करण्यात आलेले आहे

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | विशेष वेतन | तपशिल |
|---|---|---|---|
| ४२ | ११.९.२००७ | १५० | श्री. पी. एच. बागुल, कनिष्ठ सहाय्यक, उंबरठाण |

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.एस.एस.पी.१२८८/५७८/सेवा/१० दिनांक १७.१०.१९८८ मधील निर्देशांप्रमाणे विशेषवेतन मंजूर करतांना परीच्छेद २(७) प्रमाणे प्रत्येक वित्तीय वर्षात रोख आर्थिक व्यवहारांचे पुनर्विलोकन करण्यात येईल, अशी अट आहे. याप्रमाणे कार्यवाही न करता वरीलप्रमाणे विशेषवेतन नियमबाहय प्रदान केले आहे.

विशेष वेतन प्रदान करण्यात आलेल्या कर्मचा-यांचे मागील वर्षाच्या रोख आर्थिक व्यवहाराचे पुनर्विलोकन अहवाल यथोचित असल्याची खात्री करुन लेखापरिक्षणास ते उपलब्ध करुन देण्यात यावेत.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- वेतनपटावर मुद्रांकीत पोहच न घेतलेबाबत.**

पंचायत समिती सुरगाणा यांचेकडील सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षातील वेतन देयकांची पडताळणी केली असता वेतन देयकांवर संबंधित कर्मचा-यांची मुद्रांकीत पोहच घेतलेली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डीडीओ-१००५/प्र.क्र. ५/कोषा/प्रशा-५/दिनांक २९.८.२००५ नुसार वेतनपटावर मुद्रांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती सुरगाणा यांनी कोणत्याही कर्मचा-यांच्या सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात मुद्रांकीत स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत. तरी सर्व कर्मचा-यांच्या मुद्रांकीत स्वाक्ष-या घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजुर कराराची नमुना नंबर ४८ मधील नमुन्यात नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेण्यात यावी व प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी करावी अशी तरतुद आहे. मात्र पंचायत समिती, सुरगाणाने अशाप्रकारची नोंदवही परीरक्षीत केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे, इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी फॉर्म नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- उपविभागाकडील अपूर्ण बांधकामांबाबत.**
**(इ व द उपविभाग, सुरगाणा)**

बांधकाम उपविभाग सुरगाणा यांचेकडे अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक "५" मध्ये नमुद केलेप्रमाणे ५ अपूर्ण कामे असून त्यात रक्कम रुपये ३,७०,६८३/- एवढी गुंतलेली आहे. तर परिशिष्टात नमुद इतर ५ कामे सुरुच केलेली नाहीत.

सदरची कामे वेळीच पूर्ण न झाल्याने योजनेचा फायदा ग्रामीण भागातील जनतेला झालेला नाही. तसेच अपूर्ण अवस्थेतील कामे काळाच्या ओघात अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती इत्यादी बाबींमुळे नष्ट होण्याची शक्यता असल्याने शासनाचे कायमस्वरुपी आर्थिक नुकसान होऊ शकते.

नविन कामे हाती घेणे अगोदर अथवा नविन कामांना मंजूरी अगोदर जूनी कामे मुदतीत पूर्ण करुनच नविन कामे मंजूरीची कार्यवाही व्हावी. परिशिष्टात नमुद कामे पूर्ण करुन त्यांचे मालमत्ता नोंदीसह अनुपालन दर्शवावे.

४ बांधकाम
उपविभाग (इ व द)

---

**<u>परिच्छेद क्रमांक २४ :- लघुपाटबंधारे उपविभाग, सुरगाणा यांचेकडील नोंदवही क्र. ३९ व ४१ बाबत.</u>**

पंचायत समिती सुरगाणा यांचेकडील लघुपाटबंधारे उपविभागाकडील नोंदवह्या नमुना क्रमांक ३९ व ४१ ची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहे.

१) नमुना नंबर ३९ नोंदवहीतील रकाना क्रमांक ७,८ व ९ मध्ये वाढ – घट बाबत तपशील नमुद केलेला नाही.

२) नमुना नंबर ३९ मधील नोंदवहीत एकूण २१ पाझर तलावांची नोंद घेण्यात आली असून त्यामध्ये दिनांक १.४.२००६ नंतर घसारा रक्कम परिगणित करुन पुस्तकी किंमत दर्शविलेली नाही.

३) नमुना नंबर ४१ नोंदवहीत एकूण ४ पाझर तलावांच्या नोंदी घेण्यात आल्या असून नोंदवहीतील रकाना क्रमांक २ मध्ये अधिग्रहण दिनांक नमुद केलेला नाही. तसेच रकाना क्रमांक ८ ते १३ मध्ये काहीही तपशिल नमुद केलेला नाही व उपअभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

४) नमुना क्रमांक ४१ मधील जमिनीचे अद्ययावत ७/१२ उतारे घेऊन सदर जमिनी सुरक्षित, विहित वापरात व अतिक्रमण मुक्त असल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ९८ नुसार दरवर्षी माहे जून महिन्यात मालमत्ता पडताळणी प्रमाणपत्र मा. कार्यकारी अभियंता व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. तथापि सन १९९७ नंतर असे प्रमाणपत्र सादर केल्याची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

उपरोक्तप्रमाणे पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २५ :- बांधकाम उपविभाग, सिन्नर यांचेकडील नोंदवही क्र. ३९,४०, ४१ बाबत.</u>**

पंचायत समिती, सुरगाणा अधिनस्त बांधकाम उपविभागातील नोंदवह्या तपासल्या असता खालीलप्रमाणे अपूर्णता आढळून आलेल्या आहेत.

१) नोंदवही क्रमांक ३९ – एकूण ३ नोंदवह्या दप्तरी आहेत. क्रमांक ३ च्या नोंदवहीत सन १९९३ – १९९४ पर्यंतच्या नोंदी नमुद आहेत. सन १९९४ – १९९५ ते सन २००४ – २००५ या कालावधीतील झालेल्या कामांच्या नोंदी नाहीत.

२) नोंदवही क्रमांक ४० – (रस्ता नोंदवही) फक्त १७९ रस्त्याच्या कामांच्या नोंदी आहेत. नोंदवहीतील आवश्यक रकाने निरंक आहेत.

रकाना क्रमांक ८ :- काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद नाही.

रकाना क्रमांक ९ :- सरासरी प्रति कि.मी.चा खर्च नमुद नाही.

रकाना क्रमांक १० :- प्रत्येक कि.मी.चा दुरुस्तीसाठी केलेला खर्च नमुद नाही.

रकाना क्रमांक ११ :- उपअभियंता सुरगाणा यांनी नोंदी तपासून स्वाक्षरी केलेली नाही.

३) नोंदवही क्रमांक ४१ – (खुल्या जागा) सदरच्या नोंदवहीत मोकळ्या जागांच्या नोंदी नमुद आहेत. परंतु मोकळ्या जागांचे अद्ययावत ७/१२ उतारे घेण्यात आले नाही.

४) नमुना क्रमांक ४१ मधील जमिनीचे अद्ययावत ७/१२ उतारे घेऊन सदर जमिनी सुरक्षित, विहित वापरात व अतिक्रमण मुक्त असल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- शिलकी रक्कमेची सुरक्षितता व पडताळणीबाबत**

पंचायत समिती सुरगाणा यांचेकडील रोखपालाची रोखवही नमुना नंबर ४ ची तपासणी करता गटविकास अधिकारी, पेठ यांनी महिना अखेरीस पडताळणी करुन रोखवहीतील शिल्लक रक्कम व रोखपेटीतील प्रत्यक्ष शिल्लक बरोबर असल्याची खात्री करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र रोखवहीत सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षभरात एकदाही नमुद केलेले नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४२ नुसार कार्यालय प्रमुखाने किमान दर तीन महिन्यातून कार्यालयातील रोखपालाची रोखवही व रोखपेटीतील प्रत्यक्ष शिल्लक रक्कम यांची अचानक पडताळणी करुन बरोबर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच पडताळणीअंती आढळून आलेली रक्कम रोखवहीशी जुळते किंव कसे? याबाबत रोखवहीत दिनांकीत स्वाक्षरीसह प्रमाणपत्र नमुद करणे अवश्यक आहे.

तथापि गटविकास अधिकारी सुरगाणा यांनी अशाप्रकारे अचानक पडताळणी सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात केलेली नाही.

तरी नियमानुसार कार्यवाही न करण्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- आक्षेप विवरणपत्र**

लेखापरीक्षणात आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखापरिक्षण कालावधीत लागलीच करुन घेण्यात आल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित करणेत आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- लेख्यांची स्थिती.**

लेख्यांची स्थिती समाधानकारक आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- वार्षीक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे संपूर्ण पुर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही. याआधारे पंचायत समितीचे सन २००७ – २००८ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत. असे नमुद करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- अनुपालन व पोहच.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) अन्वये, अहवाल प्राप्त झालेपासुन चार महिन्यांच्या आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने, या कार्यालयाकडे पाठविणेत यावा. तसेच प्रस्तुत अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच देण्यात यावी.

(वि. ए. कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत- सविनय सादर**

१. मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२. मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
३. मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवीमुंबई.
४. मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिकरोड, नाशिक
५. मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक.

**प्रत- सस्नेह अग्रेषित.**

६. म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई.
७. म. गटविकास अधिकारी (उच्चश्रेणी), पंचायत समिती सुरगाणा, जिल्हा नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक